# ।। निरपख को अंग ।।

# मारवाडी + मराठी

✻

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

।। अथ नीर पख को अंग लिखंते ।।

सब को न्याव करे नर सोई ।। ज्यां घट अणभे ज्ञान प्रकासा ।।
हिरदे आंख खुले ऊर अंतर ।। दसमें द्वार किया तत बासा ।।
ज्ञान सु माँड सबे बिध सुझी ।। भेद सो पाँच पिछाण लिया हे ।।
सोच बिचार कहे सुखदेवजी ।। ब्रम्ह गिनान तकेस किया हे ।।१।।

जो निरपक्ष आहे आणि ज्याच्या घटात अनुभव ज्ञानाचा प्रकाश झाला आहे,तोच मनुष्य सर्वांचा न्याय करेल.देहाच्या ह्रदयात ज्ञानाचे डोळे उघडून गेले आहे.ज्याने दसवेद्वारावर जाऊन वस्ती केली आहे.त्याला सतस्वरुप ज्ञानाने सर्व सृष्टीची सर्व विधी दिसू लागते. ज्याने पाची भेद म्हणजे श्रृतज्ञान, मतैकज्ञान, मनपर्चेज्ञान, अवधीज्ञान व कैवल्यज्ञान (सतस्वरुप)ज्ञान ओळखून घेतले,तोच निरपक्ष आहे.तोच सतस्वरुप ब्रम्हज्ञान सांगेल. असे आदि सतगुरू सुखरामजी महाराज समजुन विचार करून सांगत आहे.।।१।।

मनोहर छंद ।।

काम हीन क्रोध डिंभ लोभ हीन मोह हे ।। अरी आठ पोर सुण राम गुण गावे हे।।
पाप हीन पुन हर्ष सोग नही सांसो ।। सास ही ऊसास घर नाभ दिस धावे हे ।।
राग धेक मेरी तेरी कछु नही धारणा ।। निर पखी ज्ञान करे ओरूं समझावे हे ।।
कहे सुखराम हर नाम रस पिजीये ।। एसो हरीजन हरी रामजी कूं भावे हे ।।२।।

जो निरपक्ष मनुष्य आहे,त्याला काम,क्रोध,लोभ,मोह व दंभ हे राहत नाही,तो तर आठोप्रहर रात्र दिवस राम नामाचे गुण गात राहतो,ते पाप व पुण्य काहीही जाणत नाही. त्यांना कोणत्याही प्रकारचा हर्ष होत नाही.कोणी मरुन जरी गेले त्याचा शोक(दु:ख)ही होत नाही.चिंता(फिकीर)कोणत्याही गोष्टीची करीत नाही,ते श्वासोश्वासाने भजन करतात ,त्यांची श्वास नाभीकडे पळते,त्यांना कोणाशीही राग म्हणजे द्वेष आणि माझी वा तुझी धारणा होत नाही,ते तर निरपक्ष(कोणाचाही पक्ष न ठेवता)ज्ञान सांगून दुसऱ्यांना समजावतात,आदि सतगुरू सुखरामजी महाराज सांगतात की,ते हर म्हणजे राम नामाचा रस पितात,असे हरजन रामजीला आवडतात.चांगले लागतात.।।२।।

एसो हरीजन हर राम कूं पियारो जूं ।। घर बन मधे मन एक हूं रहावे हे ।।
वास न ऊपास भूल आन नही पूजबा ।। बेद न कुराण जुग सुख नही गावे हे ।।
तीन तिर लोक सुर देव नही धारणा ।। परा पेल ब्रम्ह सूं ज्युं प्रित सो लगाई हे ।।
केहे सुखराम एसो साधुजन जुग मांही । हम वे तो सगे यार सुणो गुरू भाई हे ।।३।।

असा हरजन (रामजीचा जन) असेल ते हर (रामजीला) प्रिय आहे, ते घरात राहो वा वनवासात,त्यांचे दोन्ही जागी मन एक सारखेच राहते,ते वास(व्रत करून भूकेले राहणे) कधीही करीत नाही.उपवास(दुसऱ्या देवातांचे इष्ट,दुसऱ्या देवाची पुजा),अशी कोणत्याही

देवाची उपासना करत नाही आणि अन्य देवतांना चुकूनही पुजत नाही,ते वेदही मानीत नाही,कुराणही मानत नाही आणि ते या संसाराचे सुखही मानत नाही,(जसे तपश्या करून राजा होतो,शंभर यज्ञ करून इंद्र होतो(इत्यादी,इत्यादी),तर असेच संसाराचे सुखाकरीता ही कर्म करून,संसाराचे सुख मिळायलाच पाहिजे यालाही मानत नाही.हे तीन्ही त्रिलोकी देव(ब्रम्हा,विष्णु,महादेव)आणि सुर(तेहेतीस कोटी देवता)यांनाही धारण करीत नाही.ते परा म्हणजे पारब्रम्ह होणकाळाच्या पलीकडील सतस्वरुप ब्रम्हशी प्रिती लावतात,असे साधु जे संसारात आहे,ते आणि मी तर सख्खे गुरू भाऊ आहे,असे आदि सतगुरू सुखरामजी महाराज बोलले.।।३।। ।। इति नीर पख को अंग संपूरण ।।